जालना जिल्हा कारागृहास इंटरनेट जोडणीसाठीचे अंदाजपत्राकास प्रशासकीस व खर्चाची मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः जेएलएम-०९१७/प्र.क्र.११२/तुरुंग-२
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १७ नोव्हेंबर २०१७

वाचा

१) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.इप्र/जालना कारागृह /इंटरनेट/६९५६/कक्ष-६, दि.०९.०८.२०१७
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनिमय भाग-२ दिनांक १७ एप्रिल २०१५

प्रस्तावना

जनहित याचिका क्र. ७,८ व ९/२०११ मध्ये न्यायालयाने राज्यातील सर्व कारागृह व न्यायालये व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधेने जोडण्यात यावीत याबाबत आदेश दिले आहेत. सन २०११-१२ पासून कारागृह व न्यायालय यांचे दरम्याने वेब बेस व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधा बसविणेचे काम सुरु असून त्या अंतर्गत नवनिर्मित जालना जिल्हा कारागृहास देखील व्हिडीओ कॉन्फरन्सिंग संच उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

जालना जिल्हा कारागृहास इंटरनेट सुविधा पुरविण्याकरीता बी.एस.एन.एल कार्यालयाने दिलेले रु. ५,८८,५००/- (अक्षरी रुपये पाच लाख अठ्याऐंशी हजार पाचशे फक्त) इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनाच्या प्रशासकीय व खर्चाच्या मान्यतेसाठी सादर केले आहे. त्यास अनुसरुन याद्वारे शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

शासन निर्णय

जालना जिल्हा कारागृहास इंटरनेट सुविधा पुरविण्याकरीता बी.एस.एन.एल कार्यालयाने दिलेले रु. ५,८८,५००/- (अक्षरी रुपये पाच लाख अठ्याऐंशी हजार पाचशे फक्त) इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उप विभाग-दोन,अनुक्रमांक-४, नियम ७ अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर प्रकरणी होणारा खर्च मागणी क्र.बी-५, मुख्य लेखाशीर्ष २०५६ तुरुंग, (००)(१०१)तुरुंग (००)(०२) जिल्हा तुरुंग दत्तमत (२०५६००४४) (अनिवार्य) १३ कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तिय वर्षातील मंजुर अनुदानातून भागविण्याची मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११७१७३०१२१६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jaysing L.Pawara

Digitally signed by Jaysing L.Pawara
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f11b49d608f53d77adcefe8115025d93bfe9db ee3f61b1c150d64818cb09f90c, cn=Jaysing L.Pawara
Date: 2017.11.17 17:34:16 +05'30'

(ज.ल.पावरा)
सह सचिव, गृह विभाग

प्रत,

१. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे,
२. कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय),महाराष्ट्र राज्य,पुणे,
३. कारागृह उपमहानिरीक्षक (मध्य विभाग), औरंगाबाद,
४. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य, नागपूर,
५. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा),महाराष्ट्र राज्य, नागपूर,
६. जिल्हा कोषागार अधिकारी,जालना,
७. अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
८. निवडनस्ती- (तुरुंग-२)